# ।। ब्रह्मस्तूती ।।
# मारवाडी+मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

।। अथ ब्रह्मस्तूती ।।

परापरी पासून सतस्वरुप ब्रम्ह,पारब्रम्ह व जीवब्रम्ह आहे.ही ब्रम्हस्तुती सतस्वरुप ब्रम्हची स्तुती आहे,जीवब्रम्ह किंवा पारब्रम्हची स्तुती नाही.

**नमो नांव गुण पार,पार तेरा कुण पावे ।।**
**नमो गत अवगत,नमो तूं भेव बतावे ।।१।।**

(सतस्वरुप)ब्रम्ह तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुमच्या गुणांचा पार नाही. संसारात तुमच्या गुणांचा पार कोण प्राप्त करु शकतो.तुमची गती अवगत आहे,संसाराच्या लोकांच्या समजण्याच्या पलीकडे आहे.संसारातील लोकांना तुमची गती समजण्याचा भेद तुम्हीच सांगू शकतात म्हणून सतस्वरुपी ब्रम्ह तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. ।।१।।

**नमो पाप खोगाळ,नमो प्रमेसर प्यारा ।।**
**नमो नांव बिन छेह्,नमो बिड्द सिर भारा ।।२।।**

सतस्वरुपी ब्रम्ह तुम्ही सर्व जीवांचे पाप नाश करणारे आहात,तुम्हास नमस्कार आहे, नमस्कार आहे.तुम्ही सर्व जीवांचे पाप मिटवणारे आहात,सतस्वरुपी परमेश्वर आहात म्हणून तुम्ही सर्वांना प्रिय आहात,तुम्हास नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुमच्या नामाचा छेह् नाही आहे म्हणजे तुमचे नाम पाप नाश करुन देण्याचा पराक्रमात अनंत आहे म्हणजे त्याचा अंत नाही आहे. तुमचे नाम सर्व पापांचे नाश करतोच करतो या करीता तुम्हास नमस्कार आहे.सर्व प्राणी मात्रांना सुख देण्याचा बिड्दचा भार तुमच्या मस्तकावर आहे म्हणून तुम्हास नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।२।।

**नमो नेट श्रीराम,नमो नारायण नीका ।।**
**नमो करण करतार,नमो केवळ हर टीका ।।३।।**

तुम्ही श्रीराम म्हणजे सतस्वरुपी राम तुम्हास नमस्कार आहे.(येथे श्रीराम हे रामचंद्रा करीता नाही म्हटले आहे)तुम्ही सर्व नरांचे नारायण आहात.(हे नारायण विष्णूकरीता नाही म्हटले आहे)म्हणजे सर्व जीवांना सुख देवाल परमात्मा आहे,तुम्हास नमस्कार आहे.तुम्ही जीवांमध्ये सुख प्रगट करणारे करतार आहात,तुम्हास नमस्कार आहे.तुम्ही केवळ रामजी सर्वांच्या वरती आहे,तुम्हास नमस्कार आहे.।।३।।

**नमो नांव निसाण,नमो सब तुज सरावे ।।**
**नमो निरंजण राय,नमो संतन मन भावे ।।४।।**

तुमचे नाव निशाणासारखे आहे,तुम्हास नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुमची सर्व सराहना करतात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्हाला मनुष्यांसारखे चौऱ्यांशी लक्ष योनीत टाकणारे इंद्रिय नाहीत.तुम्ही निरंजन सतस्वरुपी ब्रम्ह आहात,तुम्हाला नमस्कार

आहे,नमस्कार आहे.तुम्ही सर्व जीवांना चौऱ्यांशी लक्ष योनीतून काढणारे आहात म्हणून तुम्ही सतस्वरुपी संतांच्या मनाला प्रिय वाटतात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. ।।४।।

**नमो आप सेहे जीत,नमो तुही तूं होई ।।**
**नमो धरण आकास,तुज बिन ओर न कोई ।।५।।**

या भवसागराला जिंकविणारे सर्व संतांसोबत तुम्हीच आहात.सर्व जीवांचा आधार तुम्ही आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.सर्व जागी तुम्हीच तुम्ही आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.पृथ्वीपासून आकाशा पर्यंत तुमच्या शिवाय आणखी कोणी नाही आहे.तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।५।।

**नमो नांव निरधार,नमो टेके बिन करता ।।**
**नमो पुरातम पीव,नमो केवळ मन हरता ।।६।।**

तुमचे नाव निराधार आहे, तुम्ही जीवब्रम्ह,इच्छमाया किंवा पारब्रम्ह कोणाचाही आधारा शिवाय स्वत:च्या आधाराचे आहे, तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. तुम्ही बिना टेक्याचे असे स्वत:च्या टेक्याने करतार आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. तुम्ही आदि अनादि पासून सर्व जीवांचे मालक आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही केवल आहात,तुमच्यात मायेचा थोडासा ही अंश नाही तुम्हाला नमस्कार आहे, नमस्कार आहे.तुम्ही जीवांच्या मनाचे सर्व दु:ख हरण करणारे आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।६।।

**नमो हरी हर राम,नमो संतन सुखदाई ।।**
**नमो ज्हां त्हां तुज,सकळ घट रह्या समाई ।।७।।**

तुम्हीच हरी आहात,तुम्हीच हर आहात,तुम्हीच राम आहात,तुम्हाला नमस्कार आहे, नमस्कार आहे.तुम्ही सर्व सतस्वरुपी संतांना सदाकरीता महासुख देणारे आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.जेथे तेथे तुम्हीच तुम्ही आहात.तुम्हाला नमस्कार आहे, नमस्कार आहे.सर्व घटांमध्ये सामावलेले आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. ।।७।।

**नमो बिंधुसन भरम,नमो सब क्रम मिटावन ।।**
**नमो तात प्रतपाळ,नमो भौ माय लंघावण ।।८।।**

जीवांच्या सर्व भ्रमांचा व कर्मांचा नाश करणारे तुम्हीच आहात,तुम्हाला नमस्कार आहे, नमस्कार आहे.तुम्ही प्रतीपाल करणारे सतस्वरुपी पिता आहात,तुम्हाला नमस्कार आहे, नमस्कार आहे.तुम्ही जीवांना भवसागरातून पार करणारे आहात,तुम्हाला नमस्कार आहे, नमस्कार आहे.।।८।।

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**नमो आस आसमान,नमो हर अंतरजामी ।।**
**नमो संतन सब सिस,नमो केवळ हर स्वामी ।।९।।**

आकाशापर्यंत सर्व तुमची आशा लावून आहेत,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. तुम्ही सर्वांचे अंतरयामी आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.सर्व संतांच्या शिरावर तुम्हीच विराजमान आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही मायेच्या पलीकडील केवल हर स्वामी आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।९।।

**नमो मेहर जगदीश,नमो हर ग्रभ अहारी ।।**
**नमो पलक दर्याव,नमो सब मांड पसारी ।।१०।।**

तुम्ही जगदीश आहात, सर्व संसाराचे इश आहात,तुमची सर्वांवर मेहर आहे, तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्हीच गर्भाच्या आत आहार पोहचविणारे आहात.तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही एकाच पळात समुद्र भरणारे आहात आणि एकाच पळात समुद्राला खाली करणारे आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही एका पळात सर्व दुनिया वसवले आणि तुम्ही एका पळात सर्व दुनिया मिटवू शकतात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।१०।।

**नमो निरंतर माय,नमो सायब हर सांचा ।।**
**नमो अलख हर आप,नमो त्यारण हर बाचा ।।११।।**

हे सिरजणहार,तुम्ही निरंतर म्हणजे सदा प्रत्येक आत्म्यात आहात.तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही खरे साहेब आहात,तुम्ही खरे हर आहात,तुम्हाला नमस्कार आहे ,नमस्कार आहे.तुम्ही अलख म्हणजे तुमची गती लखण्यात येत नाही.असे तुम्ही हर आहात,तुम्ही राम आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही वचनांनी सर्वांचा उध्दार करणारे हर आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. ।।११।।

**नमो रूप अणरूप,रूप तेरा सब होई ।।**
**नमो ध्यान निजधाम,नमो केवळ हर सोई ।।१२।।**

तुमचे कोणते रुप नाही,तुम्ही बिना रुपाचे आहात परंतु जगातील सर्व रुप तुमचेच रुप आहेत,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुमचे ध्यान करणारे तुमचा निजधाम म्हणजे सतस्वरुपी सतगुरुचे ध्यान करतात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही केवल हर आहात.तुमच्यात कोणत्याही प्रकारची माया नाही,तुम्हाला नमस्कार आहे, नमस्कार आहे.।।१२।।

**नमो नमो गुरूदेव,नमो मुक्ति गत दाता ।।**
**नमो ब्रह्म निर्धार,नमो सुख सरण बिधाता ।।१३।।**

सतस्वरुपी गुरुदेव तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.सतस्वरुपाची मुक्ती देणारे,

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सतस्वरुपाची गती देणारे तुम्हीच दाता आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. तुम्ही जीवब्रम्ह,पारब्रम्हसारखे सतस्वरुपाचा आधार घेणारे ब्रम्ह नाही.तुम्ही निराधार सतस्वरुपी ब्रम्ह आहात.तुम्हाला स्वत:चा आधार आहे,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही तुमच्या शरणात येणाऱ्या संतांना सुख देणारे लिहून विधाता आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।१३।।

**नमो निरंजण राय,नमो आकार बिन पाणी ।।**
**नमो देव सिर देव,नमो जुग जुग जुगाणी ।।१४।।**

तुम्ही निरंजण,निराकार आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.आकाश,वायु, अग्नी,जल,धरती सर्वांमध्ये तुम्हीच तुम्ही आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. तुम्हीच सर्व देवांचे सतस्वरुप देव आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.असंख्य युगांपासून सर्व जगाला तुमचाच आधार आहे,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. ।।१४।।

**नमो राम पर पीड,नमो रमता सब माही ।।**
**नमो आप करतार,नमो केवळ हर क्वाही ।।१५।।**

तुम्ही राम दुसऱ्यांचे कष्ट हरणारे आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.सर्वांमध्ये रमणारे आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्हीच सृष्टी कर्ता व तुम्हीच केवल हर म्हणवतात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।१५।।

**नमो निरंजण देव,नमो पुरण अबिनाशी ।।**
**नमो ब्रह्म प्रब्रह्म,नमो हरी घट घट बासी ।।१६।।**

तुम्ही निरंजण देव पूरण व अविनाशी आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. तुम्हीच सतस्वरुपी ब्रम्ह आहात व तुम्हीच सतस्वरुपी पारब्रम्ह आहात व घटा घटात वास करणारे हरी तुम्हीच आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।१६।।

**नमो अचल अद्वैत,भेद जन बिरळा पावे ।।**
**नमो असंगी संग,रंग बिन रंग दिखावे ।।१७।।**

तुम्ही अचल,अद्वैत आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुमचा भेद विरळेच संत प्राप्त करतात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुम्ही सर्वां सोबत असून सर्वां पासून वेगळे आहात.तुम्ही बिना रंगाचे रंग सांगतात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।१७।।

**सुखराम दास बंदन करे,नमो ब्रह्म भगवान ।।**
**आतम तत्त अरूप हे,पुरण पद निर्बाण ।।१८।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,हे सतस्वरुप ब्रम्ह भगवान,मी तुम्हास

प्रणाम करतो.आत्म्यात राहणारे तत्त म्हणजे सतस्वरुप परमात्म्याला कोणते रुप नाही, ते अरुप आहेत.ते ने:अक्षर ध्वनी स्वरुप आहेत.तुमचा मायामुक्त असे पूर्णपद आहे, निर्वाण पद आहे,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।१८।।

**नमो नमो प्रब्रह्म,अचल निज नांव अरूपं ।।**
**नमो अखे अद्वैत,प्रम गुरू सत स्वरूपं ।।१९।।**

तुम्ही परमगुरु आहात,आदि पासून सर्व आत्म्यांचे गुरु आहात,सर्व सृष्टीचे गुरु आहात. तुम्ही सतस्वरुप आहात, तुमचे स्वरुप कधी ही मिटत नाही, तुम्हास नमस्कार आहे, नमस्कार आहे.सतस्वरुप पारब्रम्ह तुम्हास नमस्कार आहे,नमस्कार आहे.तुमचे पद अचल आहे,कधीही नाश न होणारे आहे.तुमचे नाम निजनाम आहे,ते अखंडित ध्वनी स्वरुप आहे,जगातील नामा सारखे मिटणारे नाहीत.तुमचे रुप अरुप आहे,मायाच्या चर्म चक्षुने दिसणारे रुप नाही.तुमचे रुप सतस्वरुपाच्या दिव्य चक्षुने दिसणारे रुप आहे.तुम्ही अक्षय आहात,कधी क्षय होणारे नाहीत.तुम्ही अद्वैत आहात म्हणजे माये सारखे द्वैत नाहीत. ।।१९।।

**नमो ब्रह्म अनाद,आद अगाध गुसांई ।।**
**तीन लोक चहुं चख,सकळ व्यापक हर सांई ।।२०।।**

हे सतस्वरुप ब्रम्ह,तुम्ही आदि अनादिपासून सर्व आत्म्यांचे,इच्छामायाचे,पारब्रम्हचे गुसांई म्हणजे स्वामी आहात,तुम्ही अगाध आहात,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे.तीन लोकात चहूकडे सर्वत्र हर सांई तुम्हीच व्यापक आहात,तुम्हास नमस्कार आहे,नमस्कार आहे.।।२०।।

**नमो नमो सब माय,नमो सबही सुं न्यारा ।।**
**नमो प्रगट नही गुपत,छीपत नही लिपत लगारा ।।२१।।**

तुम्ही सर्वात ही आहात आणि सर्वाहून वेगळे ही आहात.तुम्ही प्रगट आहात,गुप्त नाहीत, तुम्ही लेशमात्र ही लपत नाहीत,तसेच तुम्ही लेशमात्रही लिपायमान नाहीत,तुम्हाला नमस्कार आहे,नमस्कार आहे. ।।२१।।

**नमो नमो निर्बाण पद,निजानंद निश्चल पदा ।।**
**सुखराम दास वंदन करे,चरण कंबळ बंदु सदा ।।२२।।**

तुमच्या निर्वाण पदास नमस्कार आहे,नमस्कार आहे.ते पद निश्चल आहे व हंसाला सदा आनंद देणारे पद आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,मी तुमच्या चरण कमलाची वंदना नेहमीच करतो.।।२२।।

।। श्लोक ।।

**धर्मों न कर्मों ।। ग्यानो न ताई ।। नही बाप मईया ।। बेना न भाई ।।**

**द्रिष्टो न मुष्टो ।। नामो न ठाँणा ।। क्हें इम सुखंग ।। ब्रह्म बखाणा ।।२३।।**

तुम्ही धर्माहून,कर्माहून,ज्ञानाहून परे आहात.तुम्हाला आई,वडील,बहिण व भाऊ नाही आहेत.तुम्ही न दृष्टीत येत न मुठीत येत.तुमचा कोणता मुक्काम नाही आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अशी सतस्वरुप ब्रम्हची महिमा आहे. ।।२३।।

**जातो न पातो ।। न्यातो न मेला ।। नही धुप रूपंग ।। संगी अकेला ।।**
**आबो न जाबो ।। केबो न काई ।। क्हे इम सुखंग ।। ब्रह्म गुसांई ।।२४।।**

तुमची कोणती जात नाही,तुमची कोणती पात नाही आहे व तुमचे कोणते जातीवाले नाहीत व तुमचा कोणासी मेळ मिलाप नाही.तुमचा कोणता धुप नाही व तुमचे कोणते रुप नाही,ना तुमचा कोणी संगी आहे.तुम्ही कोणा सोबत जात ही नाही व येत ही नाहीत व ना तुम्ही कोणाला काही बोलता.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, सतस्वरुप ब्रम्ह गुसांई असा आहे.।।२४।।

**छोटो न मोटो ।। फोरो न भारी ।। नही केहन किमत ।। थाहा बिचारी ।।**
**जनम्यो न जननी ।। बंधु न मेला ।। क्हे इम सुखंग ।। ब्रह्म अकेला ।।२५।।**

हे सतस्वरुप ब्रम्ह,तुम्ही न छोटे आहात,ना मोठे आहात,ना तुम्ही हलके आहात,ना भारी आहात.तुमची हिकमत कला सांगण्यात येत नाही व तुमचा थांग विचारात येत नाही.तुम्ही न जन्मले आहे,न तुमची कोणी माता आहे,ना तुमचे कोणी बंधु आहे.ना तुमचा कोणाशी मेळ मिलाप आहे.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की, सतस्वरुप ब्रम्ह असा एकटा आहे. ।।२५।।

**घी साव पुस्पंग ।। जळ मीन पंथो ।। उडे बिहंग भंवरा ।। क्हां गेल संतो ।।**
**सेझाँस सुखंग ।। सो जीव जाणे ।। युं ब्रह्म सुखम् ।। कोई संत पिछाणे ।।२६।।**

मला तूपाचा स्वाद,फुलाचा सुगंध,पाण्यात मासोळीचा रस्ता,आकाशात उडणारे पक्षी व भवऱ्यांचा रस्ता कसा आहे व सेजचे सुख कसे आहे,हे कोण सांगेल?तर ज्याने जानले आहे तोच सांगेल.असेच सतस्वरुप ब्रम्हच्या पदाचे सुख सतस्वरुपी संतच जाणतात, अन्य कोणालाही म्हणजे पारब्रम्ह,इच्छामाया,ब्रम्हा,विष्णू,महादेव,शक्ती,अवतार,जगातील सर्व लोक केसा इतकेही जाणत नाही,असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज बोलले. ।।२६।।

– इति ब्रह्म स्तुति समाप्त –